# प्रकरण - ५

# निष्कर्ष

# प्रकरण ५ वे

## निष्कर्ष

### वैयक्तिक माहिती

१) लिंग :-

कामगार शिक्षण वर्गात स्त्री कामगारांपेक्षा पुरुष कामगारांनी जास्त प्रमाणात भाग घेतलेला आहे. कारण मिलमध्ये अतिशय श्रमाची कामे असल्यामुळे पुरुषच जास्त कामास आहेत. साहजीकच कामगार शिक्षण वर्गात पुरुष कामगारांचे जास्त प्रमाण आहे.

२) धर्म :-

कामगार शिक्षण वर्गात इतर धर्मातील कामगारांपेक्षा हिंदू धर्मातील कामगारांनी जास्त प्रमाणात भाग घेतलेला आहे. कारण हिंदू धर्माची लोकसंख्या इतर धर्मातील लोकसंख्येपेक्षा अतिशय जास्त आहे. हिंदू धर्म हा बहुसंख्यांक धर्म आहे. इतर धर्माची संख्या नगण्य आहे.

३) वय :-

२९ ते ३८ या वयोगटातील कामगारांनी कामगार शिक्षण वर्गात जास्त प्रमाणात भाग घेतलेला आहे. या वयातील कामगारांमध्ये परिपक्वता आलेली असते. त्यांच्यामध्ये कर्तव्यांची व जबाबदारीची जाणीव निर्माण झालेली असते. तसेच या वयोगटातील कामगार अतिशय उत्साही असतात.

४) शिक्षण :-

कामगार शिक्षण योजनेत माध्यमिक पर्यंत शिक्षण झालेल्या कामगारांनी जास्त प्रमाणात भाग घेतलेला आहे. कारण मिलमधील काम हे अतिशय श्रमाचे व कष्टाचे आहे. पदवी संपादन केलेले पदवीधर पांढरपेशीय कामाकडे जास्त प्रमाणात जाताना दिसून येतात. म्हणून मिलमध्ये कनिष्ठ दर्जाची कामे करण्यास असे पदवीधर सहसा जात नाहीत त्यामुळे माध्यमिक पर्यंतचे शिक्षण घेतलेल्या कामगारांचे जास्त प्रमाण दिसून येते.

५) नोकरीचे स्वरूप :-

मिलमध्ये कायम स्वरूपात नोकरीस असलेल्या कामगारांनीच कामगार शिक्षण योजनेत जास्त प्रमाणात भाग घेतलेला आहे. याचे कारण असे देता येईल की, हंगामी म्हणजे बदलीवरच्या कामगारांना आपल्या कौटुंबिक गरजा भागविण्यासाठ सतत प्रयत्नशील रहावे लागते. नेहमी तो काळजीत असतो. चिंतेच्या गर्तेत असणारी व्यक्ती अशा योजनेत सहभागी होणेच अशक्य आहे. ज्याकांही बदली कामगारांनी शिक्षण योजनेत भाग घेतलेला आहे ते बहुधा अविवाहीत होते. कामगार शिक्षण वर्गात भाग घेण्यासाठी व्यक्ती ही कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, मानसिक या सर्व बाबतीत समाधानी असावी लागते. समाधानी व्यक्ती कामगार शिक्षण वर्गात जावून कांहीतरी संपादन करण्याचा प्रयत्न करेल.

६) वैवाहित स्थिती :-

कामगार शिक्षण वर्गात भाग घेतलेले बहुतेक कामगार विवाहित आहेत. याचे कारण असे की भारतामध्ये बहुतेक व्यक्तीचे लग्न हे लवकरच होते. बहुतेक

कामगारांचे १८ वर्षांच्या आत लग्न झालेले असते हे आपणास दिसून येते. आपला मुलगा व्यवस्थित कामाला लागावा व चांगल्या मार्गास लागावा व व्यसनांच्या आहारी जावू नये म्हणून लवकर लग्न करण्याचे प्रमाण जास्त आहे. आणि २९ ते ३८ या वयोगटातील कामगारांचे या योजनेत भाग घेण्याचे जास्त प्रमाण असल्यामुळे विवाहितांचे जास्त प्रमाण आहे.

७) भाषा :-

मराठी भाषिकांचे या योजनेत जास्त प्रमाणात सहभाग आहे. हे आपणास दिसून येते. कारण सोलापूर शहरात हिंदूचे प्रमाण जास्त आहे. तसेच सोलापूर शहर हे महाराष्ट्र राज्यात आहे व महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य म्हणून ओळखाले जाते. तसेच बहुसंख्य मराठी माध्यमातून शिक्षण घेत असतात त्यामुळे या योजनेत मराठी भाषिकांचे जास्त प्रमाण आहे.

कौटुंबिक माहिती :-

१) कुटुंब सदस्य संख्या :-

कामगार शिक्षण वर्गात १० पर्यंत सदस्य संख्या असलेल्या कुटुंबातील कामगारांचे जास्त प्रमाण आहे. कारण सर्व सामान्यपणे जास्त कुटुंब सदस्य असल्यानंतर घरातील इतर कामे करण्यास त्यांची मदत होत असते व त्यामुळे कामगारांना कामगार शिक्षण वर्गात जाण्यास वेळ मिळतो.

२) कुटुंबातील साक्षरता :-

कामगार शिक्षण योजनेत भाग घेतलेल्या बहुसंख्य कामगारांच्या कुटुंबातील कांही सदस्य साक्षर व कांही सदस्य निरक्षर आहेत याचे कारण असे की बहुसंख्य

कुटुंबात स्त्रीयांना शिक्षण दिले जात नाही. स्त्रीयांचे कार्यक्षेत्र "चूल आणि मूल" एवढेच मर्यादित आहे असे अनेक भारतीयांना आजही वाटते. संशोधकाच्या निरीक्षणाच्या अनुषंगाने बहुसंख्य कामगारांच्या माता व पत्नीचे शिक्षण नाही. परंतु त्यांच्या मुलींना ते शिक्षण देताना आढळून आले. म्हणजे वर्गातील एक भाग म्हणून साक्षरता वाढण्यास मदत झाली.

३) कामगारांचे उत्पन्न :-

कामगार शिक्षण वर्गात रुपये ९००१ ते रुपये १३००० च्या दरम्यान वार्षिक उत्पन्न असणा-या कामगारांचे जास्त प्रमाण आहे. कारण कामगार शिक्षण वर्गात कायम स्वरुपाच्या कामगारांचे जास्त प्रमाण आहे. कायम स्वरुपी कामगारांना सरासरी दरमहा रु. ९०० ते ११०० च्या दरम्यान वेतन मिळते. म्हणूनच रुपये ९००१ ते रुपये १३००० च्या दरम्यान वार्षिक उत्पन्न असलेल्या कामगारांचे जास्त प्रमाणात सहभाग आहे.

४) किमान कौटुंबिक गरजा :-

कामगार शिक्षण योजनेत सहभागी झालेल्या बहुसंख्य कामगारांच्या वार्षिक उत्पन्नात किमान कौटुंबिक गरजा पूर्ण होत नाहीत असे दिसून येते. याचे कारण वाढत चाललेली महागाई व महागाईच्या प्रमाणात वेतन वाढत नसल्यामुळे गरजा पूर्ण होत नाहीत. वाढत्या महागाईच्या अनुषंगाने सरकारी कर्मचा-यांना महागाई भत्यात व वेतनात वाढ होताना दिसून येते. परंतु सर्व सामान्य कामगारांच्या वेतनात फारसा बदल होत नाही. त्यामुळेच त्यांच्या किमान कौटुंबिक गरजा पूर्ण होत नाहीत.

५) अ) कौटुंबिक गरजा पूर्ण होण्याचे कारण :

कामगार शिक्षण वर्गात सहभागी झालेल्या कामगारांच्या सदरच्या वार्षिक उत्पन्नात किमान कौटुंबिक गरजा पूर्ण होतात असे ज्या कामगारांनी मत व्यक्त केलेली आहेत त्यांच्यापैकी बहुसंख्य कामगारांचे मर्यादित गरजामुळे त्यांच्या कौटुंबिक गरजा पूर्ण होतात• कामगार हा मुलभूत गरजेवरच जास्त भर देतो व तो चैनीच्या व ऐषआरामाच्या वस्तूकडे वळत नाही• त्यामुळे तो इतर वस्तूकडे आकर्षिला जात नाही व मुलभूत गरजा भागवण्याचाच प्रयत्न करत असतो•

ब) कौटुंबिक गरजा पूर्ण होत नाहीत याचे कारण :

कामगारांना मिलमध्ये जे उत्पन्न मिळते ते अतिशय अल्प प्रमाणात आहे• सरकारी कर्मचा-यांच्या उत्पन्नाचा व कामगारांच्या उत्पन्नाचा विचार केला तर आपणास सहज लक्षात येईलकी कामगारांना मिळणारे उत्पन्न हे अतिशय अल्प आहे• या अल्प उत्पन्नामुळे कामगारांच्या ज्या कौटुंबिक गरजा आहेत, त्या त्यांना पूर्ण करता येत नाहीत हे आपल्या लक्षात येते•

६) कौटुंबिक स्वास्थ्य :-

कामगार शिक्षण वर्गात सहभागी झालेल्या बहुसंख्य कामगारांना कौटुंबिक स्वास्थ्य मिळते कारण अजूनही भारतात एकत्र कुटुंब पध्दतीचा प्रभाव आहे• आज या एकत्र कुटुंब पध्दतीचा प्रभाव जरी कमी होत चाललेला असला तरी सर्व सामान्य कामगारांमध्ये एकत्र कुटुंब पध्दती विषयी आस्था कायम आहे• कुटुंबातील या ऐक्यामुळे कामगारांना कौटुंबिक सास्थ्य लाभते• तसेच एकत्र कुटुंब पध्दतीमुळे इतर

सदस्यांचा आर्थिकदृष्टया हातभार लागत असल्यामुळेही कौटुंबिक स्वास्थ्य मिळते.

सारांशरूपाने आपणास असा निष्कर्ष काढता येईल की कौटुंबिक ऐक्यामुळे व इतर सदस्यांचा आर्थिक हातभारामुळेच कौटुंबिक स्वास्थ्य मिळते.

७) लहान मुलास नोकरी (१४ वर्षा पेक्षा कमी) :-

कामगार शिक्षण वर्गात सहभागी झालेल्या कोणीही लहान मुलाला म्हणजे १४ वर्षापेक्षा कमी असलेल्या मुलास कोठेही नोकरीस लावलेले नाही. कामगार आपल्या मुलांना उच्च शिक्षण देऊन त्यांना चांगल्या ठिकाणी कामास लावण्यासाठी पात्र करावे, आपल्या मुलांनी तरी चांगले व्हावे, म्हणून लहान मुलांना नोकरीस न पाठवता शाळेत पाठवतात.

८) लहान मुलांचे शिक्षण :-

कामगार शिक्षण योजनेत सहभागी झालेल्या जवळ जवळ सर्वच कामगारांनी आपल्या मुलांना शिक्षण दिले आहे कारण आज शिक्षणाचे महत्व सर्वांना समजले आहे. व्यक्ती विकासासाठी शिक्षण हे महत्वाचे आहे. सृजनशील नागरिक बनण्यासाठी शिक्षण ाचे महत्व वादातीत आहे. देश बलवान व समर्थ बनण्यासाठीही शिक्षण महत्वाचे आहे. त्यामुळेच सर्वच कामगारांनी आपल्या मुलास शिक्षण दिलेले आहे.

ज्या कांही कामगारांची मुले शिक्षण योग्य वयापेक्षा लहान आहेत तेही शिक्षण योग्य वय झाल्यानंतर भविष्य काळात आपल्या मुलांना शिक्षण देणार आहेत, यात शंकाच निर्माण होत नाही. त्याप्रमाणे आज प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत झालेले आहे ही गोष्टी ही लक्षात घेण्यासारखी आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

क) कामगार शिक्षण विषयक माहिती :

१) कामगार शिक्षणासाठी ज्या कांही साधनाची आवश्यकता आहे, अशी सर्व साधने मिलने उपलब्ध करुन दिली आहेत, शिक्षण वर्गासाठी इमारतीची (किमान एका वर्गाची) आवश्यकता असते• त्यावर्गात फळा, बसण्यासाठी सतरंजी, प्रात्यक्षिक करता आवश्यक ती साधने मिलच्या व्यवस्थापनाने उपलब्ध करुन दिलेली आहेत हे निवेदकांच्या उत्तरावरुन आपणास अनुमान काढता येईल•

२) कामगार शिक्षण वर्गात कोणकोणत्या गोष्टीवर भर दिला जातो ?

केंद्रिय कामगार मंडळाने कामगारांकरिता शिक्षण देण्यासाठी जो अभ्यासक्रम तयार केला आहे त्या अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने कामगारांना वर्गात मार्गदर्शन केलेले आहे• उत्पादकता, ही काळाची गरज असल्याने उत्पादकतेवर भर दिला गेला• लोकसंख्या शिक्षण, कामगार कायदे, औद्योगिक संबंध, कामगार संघटना या सर्वांवर विशेष भर दिला• कामगारांना कायद्याची माहिती व्हावी व वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत• त्यामुळे लोकसंख्या विषयक शिक्षण महत्वाचे आहे• कामगारांच्या अनेक समस्या असतात त्यांना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते• अडचणींना व समस्यांना एकत्रीतपणे सामोरे जाणे केंव्हाही योग्य,संघटित पणामुळे फायदेही होतात म्हणून कामगार संघटनेविषयी माहिती सांगितली• तसेच अध्ययन सहल-ही काढली गेली• अध्ययन सहलीमध्ये आदर्श व अद्यावत कारखान्यास भेट देवून तेथील अभ्यास करावयाचा व तेथील चांगल्या गोष्टी आत्मसात करावयाच्या व आपल्या स्वत:च्या मिलमध्ये त्याचा उपयोग करण्याचा प्रयत्न करावयाचा या हेतूने अध्ययन सहल काढली जाते• तसेच प्रवासात येणा-या ऐतिहासिक व धार्मिक

स्थळांनाही भेटी दिल्या जातात. संशोधकाच्या निरीक्षणावरुन असे दिसून येते की, कामगारांना अध्ययन सहलीचे जास्त प्रमाणात आकर्षण आहे. केवळ सहलीसाठीच बहुसंख्य कामगार भाग घेतात हे दिसून येते. कामगारांना आपण वर्गात काय शिकलो यापेक्षा आपण सहलीला गेलो होतो एवढेच लक्षात राहते. या एकाच निष्कर्षावरुन असे अनुमान काढता येतेकी केवळ अध्ययन सहलीच्या आकर्षणामुळेच कामगार शिक्षण वर्गात बहुसंख्य कामगार सहभागी होतात असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही.

३) व्याख्याते :-

कामगार शिक्षण वर्गात पाहुण्या व्याख्यातांना आमंत्रीत करुन त्यांना वर्गात व्याख्यान देण्यास सांगितले होते. पाहुण्या व्याख्यात्यांनी कामगार शिक्षण वर्गात येऊन व्याख्याने दिली अशा व्याख्यात्यांपैकी कामगार कार्यकर्ते व प्राध्यापक यांची व्याख्याने जास्तीत जास्त कामगारांना आवडली. कारण कामगार कार्यकर्ता हा एक कामगारच असतो. त्याला आपल्या कामगार बांधवा-विषायी आत्मियता असते व आत्मियतेनेच तो कामगारांना माहिती सांगत असतो. साहजिकच अशा कार्यकर्त्यांचे व्याख्यान आवडणार. तसेच प्राध्यापकांचे व्याख्यान हे त्यांच्या बौध्दीक कौशल्यामुळे व एखादा विषय समजावून सांगण्याच्या कलेमुळे व कामगार हा एक आपला मित्र व विद्यार्थी या नात्याने तो माहिती सांगत असतो त्यामुळे प्राध्यापकाचेही व्याख्यान जास्तीत जास्त कामगारांना आवडले.

४) शिक्षणाचा कालावधी :-

कामगार शिक्षण वर्गाचा कालावधी हा अर्धवेळ स्वरुपाचा होता. कारण

पूर्णवेळ कालावधीसाठी कामगारांना सतत ३ आठवडे शिक्षण वर्गात जाण्यास व्यवस्थापनही सोडणार नाही. ३ आठवडयाचा पगार देऊन त्यांना शिक्षण वर्गात पाठवणे कोणत्याही व्यवस्थापनास जमणार नाही व तीन आठवडयाची रजा घेऊन कामगारासही जमणार नाही म्हणून ३ महिन्याच्या कालावधीचे अर्धवेळ स्वरूपाचे वर्ग व्यवस्थापन व कामगार या दोघांनाही सोयीचे आहेत म्हणूनच अर्धवेळ स्वरूपाचे वर्ग घेतले जातात.

५) <u>सवलत</u> :-

कामगार शिक्षण वर्गात जाण्यासाठी मिलकडून किमान अर्ध्या तासाची सवलत द्यावी अशी अपेक्षा कामगार शिक्षण मंडळाकडून असताना देखिल सदर मिलच्या व्यवस्थापनाने तशा प्रकारची सवलत दिली नाही. कारण अर्धा तासाचे मिलचे उत्पादन कमी होते. एका वर्गात जवळ जवळ ४० कामगार असतात तीन महिने अर्धातास कामगारांना सोडावयाचे म्हणजे उत्पादनास मुकावे लागते म्हणून तशा प्रकारची सवलत दिली जात नाही.

६) <u>मिलपासून अंतर</u> :-

कामगार शिक्षण योजनेत मिलपासून ३ कि.मी.च्या आत ज्यांचे निवास आहे अशा कामगारांनीच जास्त प्रमाणात भाग घेतलेला आहे. कामगार शिक्षण वर्ग हे मिल सुरु होण्यापूर्वी व सुटल्यानंतर अशा दोन वेळेस घेत असतात. त्यामुळे निवास जास्त दूर अंतरावर असेल तर मिल सुटल्यानंतर त्या कामगाराला घरची ओढ लागलेली असते. त्यामुळे तो कामगार शिक्षण वर्गात जात नाही व दूर अंतरावर असलेला कामगार मिल सुरु होण्यापूर्वी मिलला लवकर येण्याचे टाळतो. त्यामुळेच दूरवरचे कामगार शिक्षण वर्गात भाग घेताना आढळून येत नाहीत.

७) मिलपासून घर दूर अंतरावर असेल तर वाहनांचा वापर :-

कामगार शिक्षण वर्गात हजर राहणेसाठी दूर अंतरावरचे कामगार सायकलचा वापर करत होते• कारण इतर वाहने (लुना•मोटार सायकल, बस, रेल्वे इ•) सर्व सामान्य कामगारांना आर्थिकदृष्टया परवडणारी नाहीत त्यामुळेच सर्रासपणे सायकलचा वापर केला जातो•

८) प्रलोभने :-

कामगार शिक्षण वर्गात सहभागी होण्यासाठी प्रलोभने दिली जातात• प्रलोभने ही बढती, बोनस अथवा कामाच्या तासाच्या सवलतीच्या स्वरूपात दिली जात नाहीत• कामगारांनी वर्गात सहभागी होण्यासाठी चहा दिला जातो• कांही वेळा वडा पाव ही दिला जातो• कामगारांनाही वर्गात सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारची प्रलोभने नको आहेत असे अभ्यासावरून दिसून येते• कामगार शिक्षण योजना ही कामगारांच्या हिताची व फायद्याची आहे• त्यामुळेच कामगार कोणत्याही प्रलोभनाची अपेक्षा न ठेवता उत्सफूर्तपणे कामगार शिक्षण वर्गात सहभागी होतात•

घ) कामगार शिक्षण योजनेचा परिणाम :

कामगारांनी कामगार शिक्षण वर्गातील अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर कामगारांमध्ये निश्चीतच बदल झालेला आहे, असे म्हणणे उचित ठरेल• कामगारांना सर्वांगीण व उपयुक्त माहिती देण्याचा कामगार शिक्षण योजनेचा उद्देश असल्यामुळे कामगारांना सर्व बाबीवर मार्गदर्शन केले जाते• त्यामुळे कामगारांमध्ये निश्चीतच बदल झालेला आहे•

कामगार शिक्षण वर्गातील अभ्यासपूर्ण केल्यानंतर कामगारांमध्ये कामात निपुणता आली असावी असे निष्कर्षावरून दिसते. कारण कामगार शिक्षण योजनांतर्गत अध्ययन सहलीच्या माध्यमातून आदर्श कारखान्यांना भेट देवून त्यातील नविन कामाचे कौषल्य, अद्ययावत यंत्राविषयीची प्रात्यक्षिक माहिती दिली जाते. तसेच कामगार उद्योगधंद्याविषयी सखोल माहिती सांगीतली जाते. त्यामुळे कामामध्ये निपुणता येते. परंतु साक्षरतेविषयी आस्था, अस्पृश्यता निवारण्याची जाणीव, अंधश्रध्दा निर्मूलन, कुटुंब नियोजनाबद्दलची आस्था इत्यादी विषयी कामगारांच्या मनात परिवर्तन व्हावयास पाहिजे होते. कामगार शिक्षण योजनेचे हे महत्वाचे उद्देश होते. लोकसंख्या शिक्षणातील एक भाग म्हणून कुटुंब नियोजनाबद्दलची आस्था निर्माण होऊन वाढत्या लोकसंख्येला आळा बसावा हाही प्रमुख हेतू होता. परंतु कामगार शिक्षण वर्गात यावर भर दिला गेला नसावा असे आपणास दिसून येते.

ग) <u>आरोग्य विषयक माहिती</u> :

कामगारांना आरोग्यविषयक प्राथमिक माहितीचे मार्गदर्शन कामगार शिक्षण वर्गात केलेले आहे. आरोग्याच्या दृष्टीने सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छते-बद्दल मार्गदर्शन केलेले आहे. त्याचप्रमाणे अपघात व आजाराच्या वेळेस प्राथमिक उपचाराबद्दल माहिती सांगीतलेली आहे. तसेच कुटुंब नियोजन करून कुटुंब मर्यादित ठेवून आरोग्य चांगले ठेवण्यावरही माहिती सांगीतलेली आहे.

१) <u>व्यसनाधिनता</u> :-

व्यसनाधिनतेचा आरोग्यावर परिणाम होतो असे बहुसंख्य कामगारांचे मत आहे व या विषयावर वर्गामध्ये मार्गदर्शन केलेले आहे. मद्यपान, गांजा, धुम्रपान

इत्यादी व्यसनाचा आरोग्यावर होणा-या परिणामाची माहिती सांगून कामगारांना अशा व्यसनापासून परावृत्त होण्याविषयी वर्गामध्ये माहिती सांगीतली आहे. कारण मद्यपानामुळे अनेक रोगांना सामोरे जावे लागते. मद्यपानामुळे केवळ आरोग्यावरच परिणाम होतो असे नव्हेतर संपूर्ण घरच उध्वस्त होते या जाणीवेमुळेच कामगार शिक्षण वर्गामध्ये विशेष भर दिलेला आहे.

२) मुलांचे आरोग्य :-

लहान मुलांचे आरोग्य सुदृढ व निरोगी राहण्यासाठी लहानपणापासूनच त्यांची काळजी कशी घ्यावी याविषयी वर्गामध्ये मार्गदर्शन केलेले आहे. सकस आहार, बालसंगोपन इत्यादी विषयी मार्गदर्शन केलेले आहे. आज बाजारात लहान मुलांसाठी सकस आहाराची अनेक प्रकारची प्रोटीन युक्त दुध डब्बे आलेली आहेत. त्यांचा वापर करावा या विषयी माहिती सांगीतलेली आहे.

म) औद्योगिक संबंध :

मालक व कामगार यांच्यातील औद्योगिक संबंध निकोप, सुदृढ व चांगले राखण्यासाठी औद्योगिक संबंधावर वर्गात मार्गदर्शन केलेले आहे. तसेच कामगार व मालक यांच्यामधील सध्या वाढत चाललेल्या औद्योगिक अशांततेमुळे आणि मालक व कामगार यांच्या परस्परविरोधी हेतूमुळे दोघांमध्ये सतत संघर्ष होत असतो. यामुळे औद्योगिक संबंध चांगले राखण्यासाठी कामगारांची जबाबदारी वर्गात शिकविण्यात आलेली आहे.

कामगार शिक्षण वर्गात मालक व कामगार यांच्यातील औद्योगिक संबंध चांगले, निकोप व निसंशय राखण्यासाठी आणि कामगार व मालक यांच्यामध्ये

बेबनाव निर्माण होवू नये म्हणून कामगारांनी प्रामाणिकपणाने व कुशलतेने काम करून उत्पादन वाढवण्यास सहाय्य केले पाहिजे असे कामगारांना शिक्षण वर्गात सांगीतलेले आहे. तसेच कामगार शिक्षण योजना व्यवस्थापन चालवत असल्यामुळे व्यवस्थापनास फायदेशीर अशाच बाबतीत मार्गदर्शन केले जाते.

संप :-

नरसिंग गिरजी मिलच्या इतिहासात ३० दिवसापेक्षा जास्त कालावधीचा संप झालेला नाही असे दिसून आले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर औद्योगिक क्षेत्रात औद्योगिक अशांतता वाढत आहे. प्रत्येक मिलमध्ये कामगार संघटनेस आपल्या मागण्या मान्य करुन घेणेस संपासारखे हत्यार वापरावे लागत आहे. मुंबईसारख्या शहरातील कापड गिरण्यामध्ये जवळ जवळ वर्षापेक्षा अधिक काळ संप चाललेला आहे हे आपणास माहित आहेच. असे जरी असले तरी नरसिंग गिरजी मिलमध्ये दिर्घकाळ संप चाललेला नाही. सदर मिल कामगारांच्या कल्याणासाठी अनेक उपक्रम राबवत असते. तसेच पगारवाढ, बोनस इत्यादी बाबतीत व्यवस्थापन कामगारांना योग्य वाटेल असे निर्णय घेऊन सत्वर अंमलबजावणी केली जाते त्यामुळे सदर मिलमध्ये जास्त कालावधीचा संप झालेला नाही.

कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग :-

कामाची चांगली परिस्थिती निर्माण करून देण्यासाठी व कामगारांच्या समस्या व्यवस्थापनास समजावून देऊन कामगारांच्या बाजूने निर्णय घेतले जावेत यासाठी कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग असावा. कामगार, मालक व सरकार यांच्यामधील औद्योगिक संबंध चांगले राहून औद्योगिकरणाची वाढ होऊन कारखाना सुव्यवस्थित चालण्यासाठी कामगारांचाही व्यवस्थापनात सहभाग असला पाहिजे

तसेच कामगारांना ही मिल आपली आहे असे वाटण्यासाठी व मिलविषयी कामगारांमध्ये आत्मियता निर्माण होण्यासाठी कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग असला पाहिजे• कामगारांना मिल विषयी आत्मियता निर्माण होवून कारखान्यासाठी कोणताही त्याग करण्यास तयार होईल यात शंका घेण्याचे कारण नाही•

भ) उत्पादकता :

१) मिलमधील उत्पादन वाढवण्यासाठी कामाची चांगली परीस्थिती असणे अतिशय महत्वाचे आहे• जेणे करून कामगारामध्ये काम करण्यास उत्साह निर्माण होऊन त्यांना काम करण्यास इच्छा निर्माण झाली पाहीजे काम करताना त्यांना थकवा येवू नये अशी परीस्थती निर्मात्रण केली तर उत्पादनात नक्कीच वाढ होईल•

२) नविन पध्दती :-

उत्पादन वाढविण्यासाठी ज्या नविन पध्दती आहेत त्या पध्दतींच्या साहयाने उत्पादन वाढण्यास मदत होते• उदा• कार्यमुल्यांकन, गुणवत्ता, प्रलोभने इ• परंतु कामगार शिक्षण वर्गामध्ये या पध्दतीविषयी मार्गदर्शन केलेले नाही• वर नमूद केलेल्या तीन पध्दती विषयी माहिती सांगीतली व त्याची अंमलबजावणी करावयाचे म्हणजे व्यवस्थापनाच्या आर्थिक तिजोरीवर जास्त ताण पडणार यामुळे या पध्दती विषयी माहिती सांगीतली गेली नसावी•

उत्पादन वाढण्याच्या दृष्टीने विचार करता नविन पध्दती विषयी मार्गदर्शन करणे व्यवस्थापन व कामगार या दोघांच्याही हिताचे आहे हे स्पष्ट होते•

## कामगार कायदे व कामगार कल्याण विषयक माहिती :-

### १) कामगार कायदे :-

भारत सरकारने व महाराष्ट्र शासनाने कामगारांच्या संरक्षणासाठी अनेक कायदे केलेले आहेत. पण हे कायदे कामगारांपर्यंत अद्याप पोहोचलेले नाहीत म्हणून कामगार शिक्षण वर्गात सर्व कायद्यांविषयी कामगारांना मार्गदर्शन केलेले आहे. व्यावहारिक जीवनामध्ये अत्यावश्यक त्या कायद्याविषयी माहिती सांगीतलेली आहे. कामगार शिक्षण वर्गातून कामगार कायद्यावर भर देऊन कामगारांना थोड्या प्रमाणात कायद्याविषयीची जाणीव निर्माण करुन दिलेली आहे. कारखाना कायदा १९४८ यावर व यामध्ये वेळोवेळी झालेल्या दुरुस्त्या या विषयी वर्गात मार्गदर्शन केलेले आहे.

### २) कामगार कल्याण :-

महाराष्ट्र शासनाने व केंद्र शासनाने कामगार कायद्यांबरोबर कामगार कल्याण विषयक योजना तयार करुन तीची अंमलबजावणी चालू केली. कामगार कल्याण विषयक तरतूदीत भविष्य निर्वाह निधी १९५२, राज्य कामगार विमा योजना १९५२, सेवा निवृत्ती इत्यादींचा समावेश होतो यावर कामगार शिक्षण वर्गात माहिती सांगीतली व त्यांचे महत्व विशद केले. तसेच गृहनिर्माण विषयक तरतूदी, रेशन इत्यादी विषयीही मार्गदर्शन केले.

### ३) औद्योगिक सुरक्षितता :-

कामगारांच्या दृष्टीने औद्योगिक सुरक्षितता महत्वाची असते. कामगारांना कामावर असताना अनेक संकटाना तोंड द्यावे लागते. कांही कामे अतिशय दक्षतापूर्वक

व काळजीपूर्वक करावी लागतात. काम करताना अपघात होवू नये म्हणून घ्यावयाच्या दक्षतेविषयी मार्गदर्शन केले गेले. तसेच काम करत असताना अपघात होवून कायमचे अपंगत्व निर्माण होण्याची शक्यता असते त्यामुळे कामगारांना अपघातानंतर ज्या कांही सुविधा पुरविल्या जातात त्या विषयी वर्गात मार्गदर्शन केलेले आहे. यासाठी कामगार नुकसान भरपाई कायद्याविषयी वर्गात मार्गदर्शन केलेले आहे. तसेच स्त्रियांच्या वर्गात प्रसुती कायद्यातील तरतूदीप्रमाणे प्रसुतीच्या काळात मिळणाऱ्या फायद्यांविषयी वर्गात मार्गदर्शन केलेले आहे.

र) कामगार संघटना :

१) नरसिंग गिरजी मिलमध्ये दोन कामगार संघटना आहेत. त्यातील एक राष्ट्रीय गिरणी कामगार संघ हा अधिकृत (मान्यता प्राप्त) आहे तर दुसरी गिरणी कामगार युनियन ही अनधिकृत (मान्यता प्राप्त नसलेली) आहे.

२) कामगार संघटनेचे सभासद :-

नरसिंग गिरजी मिलमधील बहुसंख्य कामगार इंटकप्रणित राष्ट्रीय गिरणी कामगार संघाचे सभासद आहेत. कारण राष्ट्रीय कामगार संघ ही मान्यता प्राप्त आहे तर गिरणी कामगार युनियन ही मान्यता प्राप्त नसलेली आहे. त्यामुळे राष्ट्रीय गिरणी कामगार संघाचे सभासदत्व बहुसंख्य कामगारांनी स्विकारले आहे.

३) कामगार संघटनेच्या सभा:-

कामगार संघटनेच्या सभा या गरजेप्रमाणे होतात. आपल्या संघटनेचे केलेल्या कार्याचा आढावा घेण्यासाठी ज्या सभा आयोजित कराव्या लागतात तेवढया सभा आयोजित केल्या जातात.

४) सभास हजर :-

कामगार संघटनेस गरज भासेल तेवढया सभा आयोजित केल्या जातात. संघटनेने आयोजित केलेल्या कांही सभेसच कामगार हजर राहतात. परंतु ही स्थिती समाधानकारक नाही. कामगार हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी, त्यांना आर्थिक सुरक्षितता प्राप्त करुन देण्यासाठी, उद्योगधंद्यात मान व प्रतिष्ठा प्राप्त करुन देणे. यासाठी कामगार संघटनेस निर्णय घ्यावे लागतात यासाठी कामगारांनी सभेस हजर रहावे लागते. पण कामगारांचा कामगार संघटनेकडे पाहण्याचा उदासीन दृष्टीकोन आहे. कामगार हा स्वत:च्या अडचणी निर्माण झाल्यास तो सोडविण्यासाठी येतो व नंतर संघटनेच्या कार्यालयाकडे फिरकत सुध्दा नाही तसेच कामगारांना सभांविषय आवडही नसते त्यामुळे ते सभांना हजर राहण्याचा त्रास घेत नाहीत.

५) नेतृत्व :-

कामगार संघटनेचे कारखाना पातळीवर नेतृत्व करणा-या नेत्यांची नांवे पाहता कामगार संघटनेचे जे पदाधिकारी आहेत ते कामगारातून घेतलेले आहेत. संघटनेची कार्यकारिणीही कामगारांचीच आहे. जरी कामसंघटनेचे पदाधिकारी व कार्यकारिणी कामगारांमधून निवडलेले असले तरी राष्ट्रीय गिरणी कामगार संघ ही इंटकच्या प्रभावाखाली आहे. इंटकचे सर्व नेते हे बाहेरील आहेत व राजकीय पुढारी आहेत. त्यामुळे संघटना प्रभावी ठरु शकत नाहीत ते राजकीय उद्दिष्ट डोळयासमोर ठेवूनच काम करतात.

६) कामगार सामर्थ्यवान :-

ग्रामीण कामगारासह सर्व विभागातील कामगार सामर्थ्यवान बनण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेवर जास्त प्रमाणात भर दिलेला आहे. भारत देश हा विविधतेतून नटलेला आहे. एकाच ठिकाणी अनेक धर्माचे, जातीचे, वंशाचे लोक राहत असतात परंतु आज आपणास जातीय दंगली, भाषिक तणाव, धार्मिक दंगली घडताना दिसून येत आहेत. कामगारांमध्येही एकाच ठिकाणी काम करत असताना एकमेकांविषयी अनास्थेची भावना आहे. सर्व कामगारांमध्ये एकात्मतेची व आपुलकीची भावना निर्माण होण्यासाठी कामगारांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची आवश्यकता आहे. त्यामुळेच ग्रामीण भागातील कामगारांसह सर्व विभागातील कामगार सामर्थ्यवान बनण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेवर भर दिल्यास सर्व कामगार सामर्थ्यवान बनतील असा विश्वास वाटतो.

७) कामगार शिक्षण योजना कामगार संघटना समर्थपणे चालवेल काय ?

कामगार शिक्षण योजना ही कामगारांसाठी आहे. कामगार वर्ग प्रबोधीत करण्याचा हेतू कामगार शिक्षण योजनेचा आहे. कामगार संघटना बळकट होण्यासाठी कामगारांना प्रबोधीत करणे आवश्यक आहे. कामगार संघटना ही कामगारांचीच संघटना असून कामगार शिक्षण योजनाही कामगाराकरताच आहे. त्यासाठी कामगार शिक्षण योजना ही कामगार संघटनेनी चालवावी अशी इच्छा केंद्रिय कामगार शिक्षण मंडळाची आहे व तेच एक उद्दिष्ट-ही आहे. मंडळाच्या उद्दिष्टानुसार कामगार शिक्षण योजना कामगार संघटनानी चालवावी हे योग्य आहे. कारण व्यवस्थापन ही योजना चालवताना त्यांना फायदेशीर अशा गोष्टी-

कडेच जास्त लक्ष केंद्रित करते. बहुसंख्य कामगारांच्या मते कामगार शिक्षण योजना कामगार संघटना समर्थपणे चालवू शकेल व कामगारांच्या हिताच्या दृष्टीने ही योजना कामगार संघटनानी चालवावी अशी आशाही कामगारांनी व्यक्त केलेली आहे. परंतु कामगार संघटनेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता ही योजना चालवणे कामगार संघटनेस खर्चाच्या दृष्टीने परवडणारे नाही. सारणीच्या निष्कर्षावरून असे म्हणता येईल की ही योजना कामगार संघटना चालवणे अशक्य नाही पण संघटना ही योजना चालवण्याचे धाडस सध्यातरी करणार नाही.

स) राष्ट्रीय जबाबदारी व राष्ट्रीय समस्या :

१) कामगारांची एक राष्ट्रीय जबाबदारी म्हणून रक्तदान व नेत्रदान या विषयी वर्गात मार्गदर्शन केलेले आहे. रक्तदानावर विशेष भर दिलेला आहे. कारण रक्तांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. वाढत्या मागणीच्या प्रमाणात रक्तदानाचे प्रमाण अतिशय अल्प आहे. त्यामुळे रक्तदानावर जास्त प्रमाणात महत्व पटवून दिलेले आहे.

२) रक्तदान :-

कामगार शिक्षण वर्गात रक्तदानाचे महत्व पटवून देताना "रक्तदान म्हणजे जीवनदान", "रक्तावाचून कोणी मरु नये", "रक्तदान केल्या शिवाय कोणी मरु नये." रक्तदान हे श्रेष्ठदान " इत्यादी घोष वाक्ये सांगीतली जातात. आपल्या रक्ताचा एखाद्या लहान बालकाचे, बाळाच्या मातेचे, एखाद्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या व्यक्तींचे प्राण वाचविण्यासाठी उपयोग होतो. रक्तदाताने आपणास कांही अपाय होत नाही असे जरी सांगीतले असले तरी सारणीवरून आपणास असा निष्कर्ष काढता येईलकी, रक्तदाना विषयी कामगारांमध्ये आस्था

नाही. रक्तदान न करणारांचे प्रमाण जास्त आहे व राष्ट्रीय जबाबदारीची जाणीव ठेवून रक्तदान करणारांचे प्रमाण अतिशय अल्प आहे. रक्तदानाविषयीच्या गैरसमज दूर करण्याविषयी वर्गात पाहिजे तेवढे मार्गदर्शन केले नसावे.

३) पर्यावरण :-

आजच्या विज्ञान युगात पर्यावरणाचा समतोल ढासळलेला आहे त्यामुळे मानवी जीवन धोक्यात आलेले आहे. मानवाला आज हवा प्रदुषण, पाणी प्रदुषण ध्वनि प्रदुष्ण इ. प्रदुषणाला तोंड द्यावे लागत आहे. या प्रदुषणामुळे मानवास अनेक प्रकारच्या रोगांना बळी पडावे लागत आहे. या सर्वांचा विचार करुन मिलमधील पर्यावरणाचे समतोल राखण्यासाठी मिलतर्फे वृक्षरोपणाचे कार्यक्रम झाल्याचे आपणास आढळून येते "झाडे जगवा झाडे वाचवा" ही म्हण सर्वत्र रुढ होत आहे. झाडांची मोठ्या प्रमाण्णत जोपासना केली जात आहे.

४) नागरिक :-

आदर्श नागरिक बनवण्याचे ध्येय ही कामगार शिक्षाण योजनेचे आहे. त्यादृष्टीने वर्गात माहितीही सांगीतली आहे. बहुसंख्य कामगारांनी मतदानाचा हक्क बजावलेला आहे. व कांहीनी इतरांना मतदानाचे महत्व पटवून मतदान करण्यास प्रवृत्तही केलेले आहे असे निष्कर्षावरुन स्पष्ट होते. असे जरी असले तरी बहुसंख्य कामगार मतदानाकडे उदासिनतेने पाहतात ते जागरुकतेने मतदान करताना दिसून येत नाही.

५) राष्ट्रीय समस्या :-

आपल्या भारत देशासमोर आज अनेक समस्या आहेत. त्या समस्यांची गुंतागुंत वाढत आहे. भारतासमोरील अनेक समस्यांपैकी मद्यपान या समस्येवर वर्गात

मार्गदर्शन केलेले आहे• मद्यपानामुळे कुटुंबात व समाजात अनेक समस्या निर्माण होतात• कुटुंबात दारिद्र्य वाढते• कुटुंब उध्वस्त होते• तसेच मद्यपानामुळे व्यक्तीचे आयुष्यमानही कमी होते• त्यामुळे मद्यपान या समस्येवर जास्त भर दिला मद्यपान या समस्येखेरीज राष्ट्रापुढील इतर समस्याविषयी मार्गदर्शन केले•

६) बोफोर्स प्रकरण :-

कामगार शिक्षण योजनांतर्गत अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर कामगारांमध्ये देशाच्या हिताविषयी व देशापुढील समस्येविषयी आस्था निर्माण व्हावी तसेच कामगारांनी देशातील राजकीय, सामाजिक व आर्थिक घडामोडीकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे असा कामगार शिक्षण योजनेचा हेतू आहे• व कामगार शिक्षण योजनेचा हा हेतू कितपर्यंत सफल झालेला आहे हे जाणून घेण्यासाठी संशोधकाने पंजाब बोफोर्स प्रकरणावर प्रश्न विचारलेले आहेत•

स्वित्झर्लंड मधील बोफोर्स कंपनीच्या हावित्झर तोफा खरेदी प्रकरणात कोटयावधी रुपयाची दलाली दिली गेली हे सत्य बाहेर पडून देशभर तसेच संसदेच्या दोन्ही सभागृहात यावर खडाजंगी चर्चा झालेली आहे• बहुसंख्य कामगारांनी बोफोर्स प्रकरणावर कोणतेही मत व्यक्त केलेले नाही यावर कांहीही सांगता येत नाही एवढेच बहुसंख्य कामगारांनी सांगीतले• सारणीच्या निष्कर्षावरुन आपणास असे म्हणता येईल की सर्वसामान्य कामगारांनी बोफोर्स प्रकरणाविषयी अभ्यास केलेला नसावा•

७) पंजाब समस्या :-

आज पंजाब समस्येने संपूर्ण देशवासीयांचे लक्ष वेधून घेतलेले आहे• पंजाबची

समस्या ही मुठभर राजकीय नेत्यांच्या स्वार्थासाठीच जास्त गुंतागुंतीची झाली. पंजाब मध्ये सतत राष्ट्रपती राजवटच चालू आहे. पंजाबची समस्या सोडवण्यासाठी ब्लू स्टार सारखी योजना हाती घेतली तरी पण ती समस्या अधिकच गुंतागुंतीची झाली. ब्लू स्टार नंतर भारताच्या माजी पंतप्रधान कै. श्रीमती इंदिरा गांधी यांची हत्या झाली. त्यानंतर विद्यमान पंतप्रधान राजीव गांधी यांनी पंजाबची समस्या सोडवण्यासाठी संत लोंगोवाल यांच्याशी वाटाघाटी होऊन करार झाला. करारानंतर थोडयाच कालावधीत संत लोंगोवाल यांची हत्या केली. त्यानंतर निवडणूका होवून लोकनियुक्त अकाली दलांचे सरकारी स्थापन झाले. लोकनियुक्त सरकारला ही समस्या सोडवण्यास अपयश आले. लोकनियुक्त सरकार बरखास्त करून पुनश्च राष्ट्रपती राजवट चालू ठेवली. बहुसंख्य कामगारांच्या मते पंजाबची समस्या सुटे पर्यंत पंजाबमध्ये राष्ट्रपती राजवटच चालू ठेवावी व सीमाबंदी करावी सीमाबंदीमुळे परकीय देशाकडून अतिरेक्यांना जी आर्थिक व शस्त्रांचा पुरवठा होत आहे तो बंद होवून अतिरेक्यांना शासनाशी सामना करणे कठीण होईल असा सर्वांना विश्वास वाटतो.

## पुरवणी

१) मुलाखात अनुसूची (कामगार)

२) प्रश्नावली (कामगार नेत्यासाठी)

छत्रपती शाहू सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्यूकेशन

ॲन्ड रिसर्च, कोल्हापूर

मुलाखात अनुसूची

विषय:- सोलापूर शहरातील नरसिंग गिरजी मिलमधील कामगार शिक्षण योजनेचा समाजशास्त्रीय अभ्यास.

मार्गदर्शक:- डॉ. अंबादास माडगूळकर M.A.Ph.D.        संशोधक:- श्री. देवेंद्र विठ्ठल मदने M.A.

---

(अ) वैयक्तिक माहिती

१) आपले नांव ------------------------------ लिंग-स्त्री/पुरुष
पत्ता:- ------------------------------

२) आपला धर्म कोणता ?    ( हिंदू /मुस्लीम / ख्रिश्चन / जैन / अन्य )

३) आपले वय किती आहे ?
( १९ ते २८/ २९ ते ३८/ ३९ ते ४८/ ४९ च्या पुढे )

४) आपले शिक्षण किती झालेले आहे ?
( प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक / पदवी / पदव्युत्तर / पदविका )

५) नोकरीचे स्वरूप.
हंगामी / कायम / रोजंदारी.

६) वैवाहिक दर्जा.
( अविवाहित / विवाहित / विधुर / घाटस्फोटित. )

७) मातृभाषेव्यतिरिक्त आपणास अन्य कोणत्या भाषा येतात ?

| | मराठी | कन्नड | उर्दू | इतर | |
|---|---|---|---|---|---|
| लिहिता | | | | | |
| वाचता | | | | | |

## (ब) कौटुंबिक माहिती

१) आपल्या कुटुंबातील एकूण सदस्यांची संख्या किती आहे ?
त्यापैकी स्त्रीयांची संख्या -- पुरुषांची संख्या --

२) आपल्या कुटुंबावर कुटुंब प्रमुखाचा प्रभाव आहे काय ? ( होय / नाही )

३) कुटुंबातील सर्व सदस्य साक्षर आहेत काय ? ( होय / नाही / कांही )
अ) त्यापैकी साक्षर किती आहेत ? ------------------------------
निरक्षर किती आहेत ? ------------------------------

४) आपले वार्षिक उत्पन्न किती आहेत ?
रुपये ५०००-७००० / ७०००-९००० / ९०००-११०००
११०००-१३००० / १३०००-१५००० / १५००० चे वर

५) आपल्या वार्षिक उत्पन्नात किमान कौटुंबिक गरजा पूर्ण होतात काय ?
( होय / नाही / सांगता येत नाही )
अ) कौटुंबिक गरजा पूर्ण होत असल्यास त्याचे कारण काय ?
( मर्यादित गरजा / अल्प संतती / अधिक उत्पन्न )
ब) कौटुंबिक गरजा पूर्ण होत नसल्यास त्याचे कारण काय ?
( जास्त गरजा / जास्त संतती / अल्प उत्पन्न )

६) आपणास कौटुंबिक स्वास्थ मिळते काय ? ( होय / नाही )
अ) स्वास्थ मिळत असल्यास कारण काय ?
( सर्व कुटुंब सदस्य आर्थिक दृष्ट हातभार लावतात / कौटुंबिक ऐक्य / मानसिक समाधान )
ब) स्वास्थ मिळत नसल्यास कारण काय ?
( विभक्तपणा / ऐक्याचा अभाव / मानसिक समाधानाचा अभाव / जास्त संतती )

७) कुटुंबातील लहान मुलांना (वय १४ वर्षांहून कमी) नोकरी करण्यास लावता काय ? ( होय / नाही )
अ) लहान मुलाना नोकरीस लावलेले असल्यास कोणत्या क्षेत्रात
( उपहारगृह / व्यवसाय / व्यापार / उद्योग / शेती )

८) कुटुंबातील मुलांना आपण शिक्षण दिले आहे काय ?

( सर्वांना / कांहींना / कोणालाही नाही. )

(अ) शिक्षण दिलेले नसल्यास कारण काय ?

स्वत:ची आर्थिक ओढाताण होते / वडीलांचे स्वत:च्या व्यवसायाकडे दुर्लक्ष होते / शिक्षण दिल्याने मुलांना फायदा होत नाही.

(क) कामगार शिक्षण विषयक माहिती

१) आपल्या मिलमध्ये कामगार शिक्षण योजनेसाठी पुरेशी साधनसामुग्री उपलब्ध आहे काय ? ( होय / नाही )

२) शिक्षण वर्गासाठी पुरेशी इमारतीची सोय आहे काय ? ( होय / नाही )

३) अशी इमारत सर्व सोयीने सुसज्ज आहे काय ? ( होय / नाही )

४) प्रात्यक्षिक वजा शिक्षणाकरता लागणारी अत्यावश्यक साधने मिळने उपलब्ध करून दिली आहेत काय ? ( होय / नाही )

५) आपण या वर्गात केव्हा सहभागी झालात ?

---

६) कामगार शिक्षण वर्गातून कोणकोणत्या विशेष गोष्टीवर भर दिला जातो ?

( उत्पादकता / लोकसंख्या शिक्षण / कामगार कायदे / औद्योगिक संबंध / कामगार संघटना इतर. )

---

७) कामगार वर्गात झालेल्या व्याख्यानांपैकी आपणास पुढीलपैकी कोणत्या व्यक्तीचे व्याख्यान आवडते ?

वकील / डॉक्टर / व्यवस्थापक / प्राध्यापक / कामगार कार्यकर्ते / संबंधीत सरकारी अधिकारी / अन्य.

---

८) शिक्षणाचा कालावधी किती होता ? ( पुर्णवेळ / अर्ध वेळ )

९) वर्गामध्ये जाण्यासाठी कामाच्या तासांमध्ये किती कालावधीची सवलत दिली जात असे ?

३० मिनीटे / ४५ मिनिटे / ६० मिनिटे / १२० मिनिटे.

१०) मिल व आपले घार यामध्ये किती अंतर आहे.

मिल पासून ०-१ कि.मी. / १ ते ३ कि.मी. / ३ ते ५ कि.मी. / ५ कि.मी. पेक्षा अधिक.

११) आपण दूर रहात असल्यास वर्गामध्ये हजर राहण्याकरता कोणत्या वाहनांचा वापर करता ?

( चालत / सायकल / मोटरसायकल / बस / रेल्वे. )

## ( ग ) प्रलोभने

१) वर्गामध्ये सहभाग घेण्यासाठी आपणास प्रलोभने दिली जातात काय ? (होय/नाही)

२) प्रलोभने दिली जात असल्यास, कोणती ?

( पगारवाढ / बढती / बोनस / कामाच्या तासामध्ये सवलत / इतर )

३) प्रलोभने दिली जात नसल्यास आपली त्याबद्दल अपेक्षा काय काय आहे ?

( चहा वडा पाव / पगारवाढ बढती / बोनस / तासात सवलत इतर )

## ( घ ) कामगार शिक्षण योजनेचा परिणाम

१) कामगार वर्गातील शिक्षण पूर्ण केल्यानंतर आपणामध्ये कांही बदल झाला असे आपणास वाटते काय ? ( होय / नाही )

२) बदल झाला आहे असे वाटल्यास कोणते ?

( साक्षरता / अस्पृश्यता निवारण्याची जाणीव झाली / अंधश्रध्दा / निर्मूलन / स्वत:च्या कामामध्ये निपुणता / कुटुंब नियोजनाबद्दल आस्था निर्माण झाली / बचतीची सवय लागली. )

## ( ग ) आरोग्य विषयक

१) शिक्षण योजनेतून आपणाला आरोग्यच्या दृष्टीने कांही माहिती मिळाली आहे काय ? ( होय / नाही )

२) आरोग्य विषयक माहिती मिळाली असेल तर कोणत्या बाबतीत मिळाली ?
( वैयक्तिक स्वच्छता / प्राथमिक उपचार / कुटुंब नियोजन / परिसर स्वच्छता· )

३) वैयक्तिक आणि सार्वजनिक आरोग्य या बाबतीत आपणास माहिती मिळाली आहे काय ? ( होय / नाही )

४) " व्यसनाधिनतेचा आरोग्यावर विपरीत परिणाम होतो "
याशी आपण सहमत आहात काय ? ( होय / नाही )
अ) या संदर्भात वर्गामध्ये मार्गदर्शन केले आहे काय ? ( होय / नाही )
ब) मार्गदर्शन केले असले तर कोणकोणत्या व्यसनाधिनतेबाबत मार्गदर्शन केले ?
( मद्यपान / धुम्रपान / गांजा / गर्द / तंबाखु इतर )

५) मुलांच्या आरोग्याबाबत कामगार शिक्षण वर्गात कोणकोणत्या गोष्टीवर भर दिला आहे ?
( सकस आहार / बालसंगोपन / प्राथमिक उपाय / औषधो· )

## ( म ) औद्योगिक संबंध

१) मालक आणि कामगार यांचे संबंध दृढ करण्याच्या दृष्टीने वर्गामध्ये मार्गदर्शन केले आहे काय ? ( होय / नाही )

२) औद्योगिक संबंध चांगले राखण्यासाठी कामगारांची जबाबदारी आपणास शिकवण्यात आली आहे काय ? ( होय / नाही )

३) शिकवली असल्यास कोणत्या प्रकारे ?
( प्रामाणिकपणाने काम / कुशल काम / उत्पादन वाढवणेस सहाय / संप टाळेबंदी सारखे प्रकार टाळणे )

४) आपल्या मिलच्या इतिहासात जास्तीत जास्त किती दिवसाचा संप झालेला आहे ?
१ ते ३० दिवस / ३१ ते ९० दिवस / ९१ ते १५० दिवस / १५१ ते २१० दिवस
२११ ते २७० दिवस / २७१ ते ३३० दिवस / ३३१ ते ३६५ दिवस.

५) कामगारांचा व्यवस्थापनात पुढील पैकी कोणत्या कारणासाठी सहभाग असावा असे आपणास वाटते ?
पगार वाढवून मिळणे / कामगारांच्या समस्या व्यवस्थापनास समजणे / कामगारांच्या बाजूने निर्णय होणे / संप टाळेबंदी टाळणे / कामाची चांगली परिस्थिती निर्माण करुन देणे.

( भ ) उत्पादकता

१) उत्पादकता वाढण्याच्या दृष्टीने वर्गामध्ये कोणत्या बाबतीत मार्गदर्शन केले गेले ?
कामगारांची भूमिका / व्यवस्थापनाची भूमिका / कामगार संघटनेची भूमिका / कामाची परिस्थिती

२) कामगार वर्गात उत्पादकता वाढवण्याच्या दृष्टीने कांही नवीन पध्दतींची माहिती सांगितली आहे काय ?
कार्यमूल्यांकन / गुणवत्ता / प्रलोभाने / मर्यादित कामाचे तास / इतर.

( न ) कामगार कायदे व कामगार कल्याण विषयक

१) कामगार वर्गात कामगार विषयक कायद्याबद्दल आपणास मार्गदर्शन केले आहे काय ?
( होय / नाही )

२) मार्गदर्शन केले असेल तर कोणत्या कायद्याविषायी केली आहे ?
वेतनविषायक कायदा / कारखाना कायदा १९४८ / स्टँडिंग ऑर्डर्स Standing Order
सर्व कायदे.

३) कामगार वर्गात कोणकोणत्या कामगार कल्याण विषयक बाबतीत आपणांस मार्गदर्शन केले आहे ?
भविष्य निर्वाह निधी / कामगार विमा योजना / सेवानिवृत्ती /
बोनस प्रेरक गोष्ट (Incentives) इतर.

४) कामगार वर्गात औद्योगिक सुरक्षिततेच्या दृष्टीने आपणास पुढील बाबतीत मार्गदर्शन केले आहे काय ?

कामगारांच्या नुकसान भरपाईचा कायदा / प्रसुति कायदे / इतर.

( र ) कामगार संघटना

१) आपल्या मिलमध्ये किती कामगार संघटना आहेत ?

२) आपण पुढील पैकी कोणत्या कामगार संघटनेचे सभासद आहात ?

आयटक / इंटक / भारतीय मजदूर संघ / राष्ट्रीय गिरणी कामगार संघ / अन्य.

३) आपल्या कामगार संघटनेच्या सभा वर्षातून साधारणपणे किती वेळा होतात ?

कांही वेळा / गरजेप्रमाणे / वारंवार / फक्त संपकाळी.

४) आपण सभांना हजर राहता काय ?

सर्व सभांना / कांही सभांना / एकाही नाही.

५) आपल्या संघटनेचे कारखाना पातळीवर नेतृत्व करणा-या व्यक्तीची नांवे सांगा.

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

६) कामगार वर्गात सर्व विभागातील ग्रामीण कामगारासह सर्व वर्गातील कामगार सामर्थ्यवान बनण्यासाठी आपणास पुढीलपैकी कोणत्या बाबीवर मार्गदर्शन केले आहे ?

देशभक्ती / राष्ट्रीय एकात्मता / एकता / धर्मनिरपेक्षता / स्नेहभाव (Amity) जातीय ऐक्य

७) कामगार शिक्षण योजना कामगार संघटना समर्थपणे चालवू शकेल काय ?

( होय / नाही / सांगता येत नाही )

## ( स ) राष्ट्रीय जबाबदारी व राष्ट्रीय समस्या विषयक

१) कामगार वर्गात राष्ट्रीय जबाबदारी म्हणून आपणास पुढीलपैकी कोणत्या बाबतीत महत्व पटवून दिले आहे काय ?
वृक्षारोपण / रक्तदान / नेत्रदान.

२) "रक्तदान म्हणजे जीवनदान होय" तर आपण आतापर्यंत कितीवेळा रक्तदान केले आहे ?
एकवेळा / एकापेक्षा अधिक वेळा / अनेकवेळा.

३) पर्यावरणाचे संतुलन राखण्याकरता आपल्या मिलतर्फे वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला होता काय ? ( होय / नाही )

४) नागरिक या नात्याने आपण पुढील पैकी कांही गोष्टी केल्या आहेत काय ?
मतदान करणे / मतदानास इतरांना प्रवृत्त करणे.

५) कामगार वर्गात आपणास पुढीलपैकी कोणत्या राष्ट्रीय समस्या विषयी मार्गदर्शन केले आहे काय ?
( राष्ट्रीय एकात्मता / हुंडाबळी / बेकारी / मद्यपान / गुन्हेगारी / अन्य. )

६) बोफर्स प्रकरणाबद्दल आपणास काय वाटते ?
राजीव सरकारने दलाली घेतली / अमिताब बच्चनचा हात आहे /
लाच कोणीही घेतली नाही विन छड्डा यांनी लाच घेतली /
हिंदूजांनी लाच घेतली / विरोधी पक्षांनी केलेला एक फार्स कांहीही सांगता येत नाही.

७) पंजाबची समस्या सोडवणेसाठी कोणते उपाय योजावेत ?
सीमा बंदी करावी / सुवर्ण मंदिरात अकाली नेत्यांना जाण्यास बंदी घालावी /
राष्ट्रपती राजवट लागू करावी / लोकनियुक्त सरकार स्थापन करावे /
सरकारने श्वेतपत्रिका प्रसिध्द करावी.

" सोलापूर शहरातील नरसिंग गिरजी मिलमधील कामगार शिक्षण योजनेचा समाजशास्त्रीय अभ्यास "

## प्रश्नावली (कामगार नेत्यासाठी)

प्र.१. कामगार शिक्षण योजनेवर आपला विश्वास आहे काय ?

प्र.२. कामगार व कामगार कार्यकर्त्यांना सदरचे शिक्षण अत्यावश्यक आहे असे आपणास वाटते काय ?

प्र.३. "कामगारांचे नेतृत्व कामगारांमधून विकसित झाले पाहिजे" या वाक्याशी आपण सहमत आहात काय ?

प्र.४. कामगार शिक्षण योजनेच्या उद्दिष्टाप्रमाणे कामगार संघटना राजकिय पक्षीय बांधीलकी विरहित असावी असे आपणास वाटते काय ?

प्र.५. कांही व्यवस्थापन आणि कामगार संघटना या योजनेस सहकार्य करत नाही नाहीत याबद्दल आपले मत काय आहे ?

प्र.६. या योजनेमुळे आपल्या संघटनेचा फायदा व तोटा झाला आहे काय ?

प्र.७. कामगार शिक्षण योजना आपली संघटना समर्थपणे चालवू शकेल काय ?